मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

६२४८

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे

विषय

दा. क्र. ६२४८

IRBK-0106247

IRBK-0106247




चनालय, ठाणें

# रघुवंश

मूल्य

62860

सुरस साक्षर माला

महाकवि कालिदास

# रघुवंश

★

संग्रहालय
22206
विभाग 132
क्रमांक
वाचनालय

निवेदक
प्रि सुमेर जैन
एम्. ए. बी. टी.

★

62860
IRBK-0106247

सुरस ग्रंथ माला, सोलापूर

प्रकाशक
न. गौ. व्होरा
सुरस ग्रंथमाला,
सोलापूर

★

प्रथमावृत्ति–१९५७

★

मुद्रक
कृ. ना. घळसासी,
श्रीपांडुरंग मुद्रणालय
पंढरपूर

# मनोदय

संस्कृत भाषा ही सर्व भारतीय भाषांची आई! तिचं साहित्य अमाप अन् अमोल. केव्हांही वाचलें तरी गोडी अवीट. पण ही गोडी केवळ संस्कृत जाणणाऱ्यापुरतीच मर्यादित होती. सामान्य वाचकांनाहि त्या साहित्याचा आस्वाद घेता यावा म्हणून सुरस ग्रंथमालेनें ही योजना दोन-तीन वर्षापूर्वीच हातीं घेतली होती. पण त्याचवेळीं पॉकेट पुस्तकाची योजना समोर आली आणि तिला पहिला 'चान्स' मिळाला.

आम्ही नव्या वर्षी पुन: ती योजना हातीं घेतली. अगदी सामान्य जनतेला उत्कृष्ट संस्कृत, प्राकृत, तामिल, गुजराथी, कानडी ग्रंथाचा परीचय करुन द्यावा हीच मुख्य भूमिका. प्रथमत: संस्कृत ग्रंथांचा परीचय अगदी सुलभ, सोप्या व रसाळ भाषेंत करुन देण्याचा मानस आहे. साधारणत: बारा-तेरा वर्षाच्या मुलाला व नवसाक्षरांना समजेल अशीच वाक्यरचना व प्रयोग वापरण्यांत आले आहेत. उदात्त साहित्यच जीवन उन्नत बनवितें, हे जाणूनच जीवनाला सर्व दृष्टीनें समृद्ध बनविण्यासाठीं या मालेची योजना आहे.

हें सारें करतांना खेड्यापाड्यांतील असंख्य नवसाक्षर बंधूंना आम्ही दृष्टिसमोर ठेवलें आहे. त्यांची भूक वाढली आहे. त्यांना सहज समजेल, उमजेल अशी संपादकीय दृष्टि या पुस्तकांतून कटाक्षानें ठेविली आहे. त्या असंख्य चातकांना ही कुसमें चंद्र किरणाप्रमाणें सुखी करोत हाच मालेचा मनोदय.

-प्रकाशक

# रघुवंश व कवि

अनुक्रम 22606.
विभाग ...
क्रमांक 634
नों. दि. ...

कालिदासानं मोठमोठीं काव्यं लिहिलीं त्यांत रघुवंश श्रेष्ठ. रामाचं नांव आपण ऐकतो. त्याला देव मानतो. त्याची पूजा करतो. राम जसा मोठा होता, थोर होता, तसाच त्याचा वंशही श्रेष्ठ होता. या वंशांतील एक एक व्यक्ति पहा. हिमालयाहून थोर. पराक्रमानं, बुद्धीनं, औदार्यानं थोर.

या महाकाव्यांत सर्व गोष्टी येतात. इतिहास आहे, गोड व सुरस कथा आहे, काव्य आहे, निती आहे. पदोपदीं वाटतं किती थोर माणसांची परंपरा रामाच्या वंशाला लाभली.

परंतु इतकीं सुंदर काव्य लिहिणाऱ्या या महाकवीचं चरित्र सापडत नाहीं. तो निश्चितपणें कोणत्या शतकांत झाला याचाही नीट बोध नाहीं. पण त्यामुळं वाईट वाटत नाहीं. कालिदासासारखा श्रेष्ठ कवि व नाटककार स्वतःच्या नाटकाच्या रुपानं व महाकाव्याच्या रुपानं जिवंत आहे. कालिदासानंतरच्या अनेक कवींनी स्वतःला त्याचं शिष्य म्हणवून घेतलं. कांहींनी त्याचच नांव धारण केलं. पण यामुळं मूळ कालिदासाला कांहीं बाध येत नाहीं. मानवी मनाचे सूक्ष्म धागेदोरे, त्यांच्या भावना, त्यांच्या प्रवृत्ति, चालीरिती यांची हुबेहुब वर्णनें या महाकाव्यांत सर्वत्र पहायला मिळतात. कालिदास समजून घ्यायला आपल्याच देशांतील नव्हे तर परदेशांतील विद्वानांनीं जन्मच्या जन्म खर्ची घातले आहेत. कांहीं विद्वान म्हणतात कालिदासाची पुस्तकं पूर्णपणें कळायला अद्याप कांहीं शतकं वाट पहावी लागेल.

चला, अशा श्रेष्ठ कवीच्या काव्याचा आपण आज रसस्वाद घेऊं या !

# रघुवंश

फार प्राचीन काळची गोष्ट. सूर्यवंशांतील वैवस्वत नांवाचा फार मोठा राजा झाला. सूर्यासारखा पराक्रमी. सागरासारखा उदार. त्याच वंशांत दिलीप नांवाचा राजा झाला. तो सिंहासारखा पराक्रमी. त्याच्या राज्यांत कसलीच उणीव नव्हती. सारे लोक सुखी होते. श्रीमंत होते. कष्टाळू होते. नीतिवान् होते.

परंतु राजा मनांत दुःखी होता. त्याला मुलगा नव्हता. मुलाशिवाय राज्य नकोसं वाटें. 'काय करावं!' हाच विचार त्याच्या मनांत घोळत होता. मूल व्हावं म्हणून त्यानं पुष्कळ दानधर्म केला. ब्राम्हणांना जेऊं घातलं. यज्ञ केले. पण सारं फुकट.

त्याच्या राणीचं नांव सुदक्षिणा तिला घेऊन तो वशिष्ठ मुनीच्या आश्रमांत गेला. दोघांनी मुनींना आदरानं नमस्कार केला.

"कसं काय? ठीक चाललय् ना राज्य?" मुनींनी विचारलं.

"राज्य ठीक चाललय्. पण...."

"पण काय....?" मुनींनी विचारलं. "मी असेपर्यंत राज्य ठीक चालेल पण पुढें राज्य कोण सांभाळील....?" राजा उदासपणें म्हणाला.

"अस्सं. म्हणजे पुत्ररत्न जन्मलं नाहीं ही तुझी तक्रार दिसते..."

"होय महाराज."

"मग असं कर. माझ्या येथे नंदिनी नांवाची एक गाय आहे. ती कामधेनूची मुलगी आहे. तिची सेवा कर. ती प्रसन्न होईल. तू एकदा त्या कामधेनूचा अपमान केला होतास म्हणूनच तुला मुलगा झाला नाहीं"

राजानं आणि राणीनं दुसऱ्या दिवसापासून नंदिनीची सेवा करायला सुरुवात केली. ते दोघे तिला स्नान घालायचे, पूजा करायचे. ओवाळायचे.

राजा तिला चरायला घेऊन जायचा. तिच्या अंगावर माशा बसू देत नसे. तिला सुंदर सुंदर कोवळं गवत कापून द्यायचा. कुरवाळायचा.

असं एकवीस दिवस तें सेवेचं व्रत दोघांनी केलं. नंदिनी खुष झाली. तिनं राजाची भक्ति खरी कीं खोटी हें पाहण्याचं

ठरवलं. जंगलांत ती चरत असतां एका सिंहानं तिला धरलं. ती हम्बरडा फोडूं लागली. दिलीपनं भात्यांतून बाण काढायला हात घातला. पण त्याचा हात भात्यालाच चिकटून राहिला. काय करावं हेंच त्याला कळेना.

इतक्यांत सिंह म्हणाला, ' मला मारायचा मूर्खपणा करुं नकोस. मी शंकराचा भक्त आहे. मी फार उपाशी आहे. तेव्हां मला ही गाय खाणं आवश्यक आहे.'

दिलीपला सुरुवातीला फार राग आला त्या सिंहाचा. पण उपाय नव्हता. कांहींसा विचार करुन तो म्हणाला " तुझी भूक मी शमवतों. पण तूं माझ्या या देवतेला मारु नको. ही गाय मला मातेहून पूज्य आहे. पवित्र आहे. दिलीपनें गुडघे टेकले व तो म्हणाला, " हे सिंहराजा, मी पुन: विनंती करतों. तूं तिला सोडून दे. मी तुझ्यापुढं आहे. आज मला मारूनच तूं तुझी भूक शांत कर " असं म्हणून तो सिंहाजवळ न घाबरता गेला. त्यानं आपलं शरीर सिंहापु ढंठेवलं. आणि डोळे बंद करुन तो देवाचं ध्यान करुं लागला.

बराच वेळ झाला. त्यानं डोळे उघडले. पाहतों तर तेथें सिंह नाहीं. त्यानं नंदिनीकडं पाहिलं,

नंदिनी हंसत होती. ती प्रसन्न होती. राजाचं प्रेम पाहून तिच्या डोळ्यांत आसवं आली. ती राजाला म्हणाली, " धन्य आहेस तूं. अन् तुझं प्रेम. तुला काय हवय् तें माग. मी खुष झालें आहे."

" मी अत्यंत सुखी आहे. पण मला मुलगा नाहीं. माझ्या नंतर सत्यधर्माची, प्रजेची काळजी कोण घेणार? कोण त्यांचं

संरक्षण करणार?" "खरं आहे तुझं म्हणणं. तुला पुत्र होण्याचा उपाय सांगते. ऐक" ती म्हणाली. राजा ऐकू लागला. ती म्हणाली,

"माझ्या कासेंतील दूध तूं पी व राणीलाहि दे"

दुसरे दिवशीं राजा व राणी अगदी पहाटेस उठले. नंदिनीची पूजा केली. ओवाळलं. नंतर तिच्या वासराला दूध पाजलं. उरलेलं दूध मुनीच्या परवानगीनं दोघांनी घेतलं.

मुनींनी आशीर्वाद दिला. ते म्हणाले, तुला पराक्रमी, नीतिवान व विद्वान मुलगा होवो. दोघांनी त्यांना नमस्कार केला. नंतर ते अयोध्येला परतले.

राजधानीला आल्यावर त्यांनी मोठा उत्सव केला. नऊ महिन्यांनी राणीला मुलगा झाला. राज्यांत आनंदीआनंद झाला. रस्ते. वाडे, घरं सजविण्यांत आली वाद्यें वाजूं लागली. घरोघरीं साखर वाटण्यांत आली. राजाच तो मग उत्सवाचा थाट काय पुसता? सारी अयोध्या नगरी स्वर्गाप्रमाणं नटली. मुलाचं नांव रघु ठेवण्यांत आलं.

हळुहळु रघु मोठा होऊ लागला. चंद्राप्रमाणं वाढूं लागला. चांगल्या आश्रमांत पाठवून त्याला योग्य शिक्षण दिलं. रघु तरुण झाला. त्याच्या वडलांनी ९९ अश्वमेध यज्ञ केले होते. शंभरावा यज्ञ करुन इंद्राचं पद मिळवावं असं त्यांना वाटलं. त्यांनीं शंभरावा यज्ञ करायचा ठरवला. पण यज्ञाचा घोडा इंद्रानं चोरुन स्वर्गांत नेला. घोडा कुठं गेला हें कुणालाच कळेना. घोड्याचा पुष्कळ शोध केला. पण तो सांपडला नाहीं. दिलीप राजानं रघुला बोलावलं. रघुनं ती अवघड कामगिरी आपल्यावर घेतली. त्यानं

अनुक्रम २२८०८
विभाग
क्रमांक

नंदिनीची प्रार्थना केली. नंदिनी म्हणाली, "इंद्रानं तुझा घोडा चोरुन नेला आहे."

रघूला खूप राग आला. तो इंद्राकडे गेला. इंद्रानं घोडा दिला नाहीं रघूनं घनघोर युद्ध केलं. रघू विजेसारखा चपळ होता. त्यानं क्षणार्धांत सारं आकाश बाणांनीं व्यापून टाकलं. इंद्राला त्याचा पराक्रम आवडला. त्यानं त्याची पाठ थोपटली व म्हणाला, " तुझ्या वडीलांनी फार मोठं पुण्य केल होतं म्हणून असा शूर मुलगा मिळाला. तूं अयोध्येला जा व वडीलांना सांग कीं स्वर्गांत इंद्र स्वतः तुझच स्वागत करायला तयार आहे."

रघु परतला.

कांहीं दिवसांनी त्याच्या आईवडीलांनी सन्यास घेतला व ते वनांत चालते झाले.

रघूनं इतकं सुंदर राज्य केलं कीं प्रजा दिलीपचं नांव विसरुन देखील गेली. रघूनं प्रजेला मुलांसारखं वागवलं. त्यानं पूर्वेकडील कलिंग व वंग येथील राज्यांना जिंकलं. दक्षिणेकडील पांड्य, चोल इत्यादि राजांना परास्त केलं. काबुल, कंदहार ही वायव्येकडील राज्येंही जिंकलीं.

उत्तरेपासून दक्षिणेकडे व पूर्वेपासून पश्चिमेकडे रघूचं एकछत्री राज्य पसरलं रघू म्हणजे प्रजेचा जीव कीं प्राण झाला. पराजय पावलेले राजे त्याला दरवर्षी रत्न, हिरे, माणकें, सोनें, रुपें आणून देत. आणि हा सारी संपत्ति यज्ञांत प्रजेला वाटून टाकीत असे. सारा पैसा प्रजेचा आहे असं तो म्हणे.

राजा रघूनं एकदां फार मोठा यज्ञ करायचं ठरवलं. या यज्ञाला **विश्वजित–यज्ञ** म्हणतात. या यज्ञांत राजानं सर्वस्वाचं

दान करायचं. स्वतः करितां सिंहासन देखील ठेवायचं नाहीं. कांहीं ठेवायचं नाहीं. ठरल्याप्रमाणं यज्ञ झाला. राजा भिकारी झाला. त्याच्याजवळ कांहींच उरलं नाहीं.

दुसरे दिवशीं एक कौन्स नांवाचा मुनि आला. तो म्हणाला, "यज्ञाची दक्षिणा मागण्यासाठीं मी आलो आहे. पण आतां तुमच्याजवळ तर फुटकी कवडी देखील नाहीं तेव्हां मी काय मागावें." रघूनं शांतपणें त्याला एक-दोन दिवस ठेवून घेतलं. कौन्साची मागणी पूर्ण करायची कशी हाच एक विचार त्याच्या मनांत घोळत होता.

त्यानं ठरवलं कुबेराकडे संपत्ति असते. त्याच्यावर स्वारी करावी. दुसऱ्या दिवशीं त्यानं सैन्याला हुकूम सोडला. सैन्य तयार झालं. राजाकरितां घोडा सजवून तयार करण्यांत आला.

इतक्यांत खजीनदार धांवत धांवत राजाकडं आला आणि म्हणाला, "हे राजा, काल रात्रभर आपल्या कोषागारांत सोन्याच्या नाण्यांचा पाऊस पडत होता. सारीं कोठारं सोन्याच्या नाण्यांनी भरली आहेत."

राजा हा चमत्कार पहायला गेला. सारी कोठारें सोन्यानं भरली होती. राजानं कौन्साला सांगितलं, "हे महाराज, या सोन्याच्या कोठारांतून तुम्ही पाहिजे तेवढी दक्षिणा न्या"

पण मुनीनं तसं केलं नाहीं. त्यानं आवश्यक तेवढंच सोनं नेलं. धन हे सांठविण्याकरितां नाहीं. लोकांच्या उपयोगी पडून त्यांना सुख मिळावं म्हणूनच धनाचा, संपत्तीचा शोध मानवानं लावला आहे.

रघूच्या घरी कुमार अज जन्माला आला. रघूला खूप आनंद झाला. सोन्याची, धान्याची व वस्त्रांचीं कोठारं त्यानं प्रजेसाठीं उघडी ठेवलीं. प्रजा आनंदित झाली. राजकुमाराच्या जन्मानं साऱ्यांना आनंद झाला. रघूराजानं कुमार अजाला चांगल शिक्षण दिलं. कारण तो मोठा होऊन राजा होणार होता. राजा ज्ञानी तर प्रजा शहाणी. राजा जसा असेल तशी प्रजा असते. कुमार अज संगीत, शस्त्र, युद्ध, नीति इत्यादि विद्येंत निपुण झाला.

अज तरुण झाल्यावर एकदां विदर्भ देशाच्या मुलीच्या स्वयंवरासाठीं त्याला आमंत्रण आलं. आईवडीलांना नमस्कार करुन अज स्वयंवराला निघाला. स्वयंवरांत मुलगी स्वतः नवरा निवडते. अज स्वयंवरास निघाला.

विदर्भास आल्यावर भोजराजानं त्याचं स्वागत केलं. स्वयंवरासाठीं फारच मोठा मंडप उभारण्यांत आला होता. देशोदेशीचे राजकुमार नटून थटून त्या मंडपांत येऊन बसले. अज देखील आपल्या जागीं जाऊन बसला. अजाचं रूप व तारुण्य पाहून प्रत्येकाला वाटल कीं भोजराजाची मुलगी इंदुमती त्यालाच आपला नवरा निवडील.

ठरल्याप्रमाणं इंदुमती नटून सजून स्वयंवर मंडपांत आली. तिच्या दासीनं सर्व राजपुत्रांची ओळख करुन दिली. जेव्हां अजाकडे तिनं आपली नजर भिडविली तेव्हां ती लाजली अजाच्या रुपावर ती बेहद्द खूष झाली. आणि न कळत तिच्या हातांतील सुवासिक फुलांची माळा अजाच्या गळ्यांत पडली. सर्वांनीं अजाच्या नशिबाचं कौतुक केलं. अज आणि इंदुमती हे जोडपं इतकं सुंदर होतं कीं तें पाहण्यांस सारं गांव जमा झालं.

अजाचं हें स्वागत पाहून इतर राजपुत्रांना वाईट वाटलं. त्यांनीं कट केला. आणि अज जेव्हां अयोध्येला परतला तेव्हां त्याच्यावर सर्वांनीं एकदम हल्ला चढवला. अज शूर होता. तो घाबरला नाहीं. सिंहाच्या एका गर्जनेसरशी शेकडों हत्तींचा समुदाय ज्याप्रमाणं पळत सुटतो त्याप्रमाणं सर्व राजकुमार पळत सुटले. अजाच्या बाणांनी हजारो सैनिक मरण पावले. अज विजयी झाला.

अज राजधानीला आल्यावर रघूराजानं त्याला राजा केलं.

आपणाला राज्य देवून वडील अरण्यांत निघून जातील म्हणून अजानं वडीलांचे पाय धरले व तो म्हणाला, " पिताजी, आपणच जन्म देऊन मला हे सोन्याचे दिवस मिळवून दिले. आपण नसतांना मी सुखानं कसा झोपेन? कसा जेवेन?"

अजाच्या डोळ्यांत पाणी साकळलं. वडीलांचे पाय त्यानं घट्ट धरुन ठेवले.

मुलाची ममता पाहून वडीलांचंहि हृदय गहिवरुन आलं. मुलासाठीं म्हणून ते गांवाबाहेरच सन्यास वृत्तीनें राहूं लागले.

अजाचं हृदय अगदी बालकाप्रमाणं कोमल होतं. दुःख पाहून त्याचं हृदय कळवळून उठे. वडीलांचा स्वर्गवास झाल्यावर त्याला दशरथ नांवाचा तेजस्वी मुलगा झाला. दशरथ लहानपणापासूनच अत्यंत पराक्रमी होता. तो सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्र विद्येंत प्रवीण झाला. अजाला फारच आनंद झाला. मुलाचा पराक्रम पाहून कोणत्या वडीलाला आनंद होणार नाहीं?

अज एकदां आपल्या बायकोबरोबर वनांत बसला असतांना नारद आकाशांतून जात होते. त्यांच्या तंबोऱ्यावर लटकणारी स्वर्गीय फुलांची माळ इंदुमतीच्या अंगावर पडतांच ती मरण पावली. पत्नीचा असा अंत पाहून अज अगदी वेडा झाला. त्याची ती अवस्था पाहून जंगलांतील पशु-पक्षी व वृक्षलतांनीही अश्रू ढाळले. इंदुमती त्याची अत्यंत आवडती पत्नी होती. तिचा वियोग त्याला सहन झाला नाहीं. संसारांतील ही नश्वरता पाहून त्याचं मन विटलं. अनेक ऋषींनी त्याचं मन शांत करण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ.

त्यानं दशरथाला हांक मारली. व म्हणाले, ' बाळ आतां तूंच राज्याचा मालक. उद्यापासून मी उपवासानं देहत्याग करीन. शरयू नदीच्या कांठी माझी राहण्याची व्यवस्था कर '

दशरथाला तें ऐकून एकदम धस्स झालं. उघडया डोळयानं वडीलांचं मरण पाहण्याची त्याच्यावर पाळी आली होती.

पण करतो काय ? वडीलांचा निर्णय कायम होता.

शरयू नदीकाठीं एक पर्णकुटी बांधण्यांत आली. ती हिरव्याहिरव्या वेलांनी सजविण्यांत आली. अजानं उपवास करुन देह सोडला. शहरांतील लाखों नागरिक त्याच्या अंत्यविधीला हजर राहिले.

दशरथाचं राज्य खूप दूरवर पसरलं होतं. सर्व राजे त्याला वचकून असत. इतकं मोठं राज्य ! पण दशरथ सुखी नव्हता. त्याला मूलबाळ नव्हतं. तो आता म्हातारा व्हायला आला होता. तरी परंतु मुलासाठीं त्याची धडपड चालू होती.

एकदां श्रृंगी नांवाच्या ऋषीनं त्याला पुत्रासाठीं यज्ञ करायला सांगितला. सुदैवानं त्याचा तो यज्ञ फळाला आला: त्याला चार मुल झाली. कौसल्येला राम, कैकेयीला भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न सुमित्रेला. चारहि मुल म्हणजे गुणानी परमेश्वर. दशरथाची साऱ्यावर अपार माया. राम त्याला जीवाहून प्यार. राम क्षणभर दृष्टिआड झाला तर त्याचा जीव घाबरा होई. पण दैव उलटं असतं. जीवर फार माया ती वस्तु जवळ राहात नाहीं.

एके दिवशीं विश्वामित्र ऋषी दशरथाकडे आले आणि म्हणाले, "हे राजन्, रावणाकडील लोक आमचे यज्ञ मोडून काढतात. ऋषी लोकांना पकडून लंकेला नेतात. रावणानं तर देवांना कामाला जुंपल आहे. सारा देश त्या राक्षसानं त्रासून सोडला आहे"

"मी काय मदत करावी अशी आपली इच्छा आहे....?" दशरथानं विनयानं विचारलं.

"राम व लक्ष्मण यांना आमचा यज्ञ पूर्ण होईपर्यंत माझ्याबरोबर पाठव." रामलक्ष्मणाची जोडी पराक्रमी असली तरी त्यांचं वय लहान होतं. वडीलांना आपली मुलं नेहमीच लहान वाटतात. दशरथाला होकार देणं जीवावर आलं. पण नकार देतां येईना. विश्वामित्र ऋषि असले तरी ते फार संतापी होते. रागीट होते. शाप देणं त्यांच्या डाव्या हाताचा मळ होता.

रामलक्ष्मणाला घेऊन ते वनाला गेले. इकडे दशरथाला नीट झोप देखील येईना. वनांत मुलांची काय स्थिति असेल याची सदैव चिंता त्यांना असे.

जंगलांत शिरल्यावर त्राटिका नांवाच्या राक्षसी स्त्रीनं रामावर हल्ला केला. रामानं तात्काळ तिचा वध केला. रामाचा हा पराक्रम पाहून विश्वामित्र फारच खूष झाले. मुलें निपजावीत तर अशी पराक्रमी, असें ते मनांत म्हणाले.

रामाच्या पराक्रमानं मुनींचा यज्ञ चांगल्या रीतीनें पार पडला. सर्वांनीं रामाला धन्यवाद दिले.

इतक्यांत मिथिला नांवाच्या नगरींतील जनक नांवाच्या राजानं सीतेचं स्वयंवर मांडल. मोठमोठे राजे आले. स्वतः रावण देखील त्या स्वयंवराला आला. विश्वामित्र रामलक्ष्मणाला घेऊन तिथें गेले.

जनकानं सर्वांची चांगली व्यवस्था ठेवली होती. विश्वामित्राच्या आज्ञेनं रामानं शिवधनुष्य तोडल. इतर राजांना जे जमल नाहीं तें रामानं करुन दाखविल. रामाच्या नांवाचा जयजयकार झाला. रामाला पुष्पहार घालून सीतेनं त्याला आपला नवरा निवडला. उर्मिला नांवाची दुसरी मुलगी लक्ष्मणाला देण्यांत आली.

विवाहानन्तर रामलक्ष्मण अयोध्येला यायला निघाले. वाटेंत त्यांना परशुराम भेटला. रामानं त्याला नमस्कार केला. परशुराम फारच रागीट, रामानं शिवधनुष्य तोडला हे त्याला कळालं होतं.

परशुरामाचा राग रामानं शांत केला. परशुराम रामाचं चातुर्य व पराक्रम यानं खुष झाला व तो निघून गेला

राम अयोध्येला आल्याची बातमी पसरली. साऱ्यांना वाटलं आपलाच मुलगा अनेक दिवसांनी परत आला आहे

रामानं कुठं जाऊ नये म्हणून त्याला राज्याभिषेक करावा असं दशरथानं ठरविलं, पण माणूस विचार करतो एक अन् घडतं नेमकं त्याच्या उलट.

राज्याभिषेकाची तयारी झाली. उद्या राज्याभिषेक! होणार

कैकेयीनं अडथळा केला. ती दशरथाची अत्यंत आवडती बायको. ती त्याला म्हणाली, 'भरताला राज्यपद द्या आणि रामाला....रामाला वनवासांत चौदा वर्षे पाठवा'

तें ऐकून दशरथाला वेड लागण्याची पाळी आली. दशरथानं एकदां तिला दोन वर मागायला सांगितले होते. ते तिनं आत्ता मागितले. वर देत नाहीं म्हटलं तर वचनभंग होतो व वर दिले तर रामासारख्या जीवाचा कलिजा असणाऱ्या पोराला चौदा वर्षे वनवास घडतो. पुत्रवियोग नको म्हणून राज्याभिषेकाची कल्पना दशरथानं काढली. पण पाप म्हणतात तें हेंच.

रामाला हें कळालं. तो वडीलाकडं गेला अन् त्यांना वंदन करुन म्हणाला, 'पिताजी आपल्या कुलांत वचनभंगाचं पाप कुणीच केलं नाहीं. आपणाला मी सांगतों कीं वनांत जाण्यांतच काय पण भरताला राजा म्हणण्यांतहि मला आनंद वाटेल. पिताजी, आपण पुत्र मोहानं वचनभंग करुं नये. शिवाय कैकयी कितीहि झाली तरी माझी आईचना! ती माझं अहित कसं बर चिंतील.'

दशरथ शुद्धीवर नव्हते. रामलक्ष्मण व सीता वनवासांत गेले. ही वार्ता कळताच दशरथानं पुत्र-वियोगांत आपले प्राण खर्ची घातले.

भरत त्यावेळीं आजोळी गेला होता. तो अयोध्येला आला. पाहतों तर अयोध्या स्मशानासारखी झालेली. कुणाच्या चेहऱ्यावर आनंद नाहीं. सर्व चालती बोलती प्रेतं. त्याला वाटलच कीं कांहीं तरी वाईट घडलं आहे.

आईकडे तो गेला. आईकडून त्याला सारी बातमी कळाली. आई आनंदानं सारी बातमी सांगत होती, पण भरताचा क्रोध वाढतच होता. तो आईला खूप टाकून बोलला. नंतर तो रामाचा शोध करण्यासाठीं वनांत गेला. रामाची व भरताची ती भेट इतिहासांत अजरामर झाली आहे. भरतानं त्याला घरीं चलण्याचा फार आग्रह केला. तेव्हां राम म्हणाला, 'भरत, प्रजेचं पालन मी जसं केल असतं तसंच तूं करावं. तूं काय अन् मी काय ? रघुकुलाची कीर्ति उज्वल राहील याचसाठीं हें जीवन मी पसंत केलं आहे.'

भरत निरुत्तर झाला. तो रामाला वंदन करुन परतला. रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्यानं राज्यकारभार केला. धन्य आहे त्या भरताची !

पंचवटींत असतांना रावणाची बहीण शूर्पनखा रामाचं रुप पाहून मोहित झाली. लक्ष्मणानं पुष्कळदां सांगितलं कीं राम एकपत्नी आहे. तूं येथून निघून जा. पण ती कसली खाष्ट? ती लक्ष्मणाला म्हणाली, "राम नाहीं तर नाहीं तूं तरी माझ्याशी लग्न कर" लक्ष्मण संतापला. त्यानं तिचें नाक कान कापले. झाल रावणाशी वैर निर्माण झालं. रावणानं सीतेला लंकेंत नेऊन ठेवलं. रामानं पुष्कळ शोध केला पण ती मिळाली नाहीं. सुग्रीव—हनुमान इत्यादि जंगलांतील प्रमुख राजांशी त्यानं मैत्री केली. हनुमान तर त्याचा एकनिष्ठ सेवक बनला.

रावणाचा भाऊ बिभीषण हा स्वत: रावणाचा शत्रु झाला. त्यानं रावणाला सीता परत करण्याचा उपदेश केला. हीच काय ती त्याची चूक. लंका सोडून तो रामाला येवून मिळाला.

रामानं लंकेवर स्वारी केली व रावणाचा वध केला. रावणाचं राज्य नष्ट झालं. तेथे बिभीषणला राजा नेमून राम अयोध्येला परत आला. भरताचा आनंद गगनांत मावेनासा झाला. सारी प्रजा आनंदसागरांत मग्न झाली. रामराजा झाला म्हणून सारे आनंदित झाले.

पण एवढ्यानं रामाचं दुर्दैव संपलं नव्हतं.

सीता गर्भवती होती. तिला मूल होणार होतं. तेव्हां रामानं विचारलं, " तुला कसले डोहाळे होताहेत?

ती लाजली व म्हणाली " गंगेच्या कांठीं असणारीं तीर्थ क्षेत्रं पहावीत असं मला वाटतं. "

रामानं ती इच्छा पूर्ण करावयाची ठरवलं.

एके दिवशी रामाच्या दरबारांत एक परीटीन असं म्हणाली, कीं मी एक रात्र बाहेर राहिलें तर माझ्या नवऱ्यानं झोडपलं पण खुद्द रामाची बायको सहा वर्षे रावणाकडे होती तर–..

तें वाक्य सर्वांच्या हृदयांत सुरी सारखं रुतलं. लक्ष्मणानं आपली तरवार उपसली. पण रामानं शांतपणें तें ऐकून घेतलं. पूर्ण विचार करुन रामानंही सीतेला सोडून देण्याचं ठरवलं इतकंच नव्हे तर तीर्थ दर्शनाचं सोंग करून तिला अरण्यांत सोडून यायला लक्ष्मणाला सांगितलं. जेव्हां लक्ष्मण तिला

अनुक्रम २२८०८
विभाग बालवाङ्मय
क्र. ८३
नों. दि. ५/७/७१

अरण्यांत सोडून जाऊ लागला तेव्हां तिनं हंम्बरडा फोडला. त्या भयाण अरण्यांत गर्भवती सीता काय करणार?

तिची ती करुण हांक वाल्मिक ऋषींनी ऐकली. पितृ-वत्सल वाल्मिक तेथे आले. सीतासतीचं दर्शन त्यांनीं घेतलं व ते म्हणाले, 'हे सती तूं कां रडतेस ? नवऱ्यानं टाकली तरी हा अनाथांचा पिता इथं तुझ्यासमोर उभा आहे."

ऋषीचं तें दिव्यवचन ऐकून ती त्यांच्या आश्रमांत रहा-यला गेली. सीता प्रसूत झाली. सिंहासारखे शूर लव आणि कुश नांवाची मुलं तिला झाली. मुलांचे तेजस्वी चेहरे पाहून तिला रडूं आलं. "माझे राम असते तर त्यांनीं म्हटलं असतं .. अगदी तुझ्या सारखीं आहेत हीं मुलं अन् मी म्हटलं असतं ..." या आनंदाच्या वेळीं राम हजर नाहीं याचं तिला फार दुःख झालं.

सीतेला सोडून दिल्यापासून रामानं आपलं जीवन एखाद्या साधूला शोभेल इतकं साधं केलं. गवतावर ते झोपूं लागले. कस-लीहि चैन त्यांनीं केली नाहीं.

इतकंच नव्हे तर एकदां त्यांनीं राजसूय यज्ञ केला. त्यावेळीं सीतेची सोन्याची मूर्ति तयार करवून ती जोडीला म्हणून ठेविली. हें ऐकू सीतेला फार आनंद झाला.

इकडे लव आणि कुश अश्वमेध यज्ञ पाहण्यासाठीं अयो-ध्येला आले. त्यांनीं आपल्या मधुर गायनांनी संपूर्ण रामायण रामापुढं म्हणून दाखविलं. राम चकित झाला. फार मोठी दक्षिणा रामानं त्यांना दिली. पण त्यांनीं ती परत दिली. रामाला

प्रश्न पडला. तो स्वतः वाल्मिकीकडे गेला आणि सारं राज्य त्यांच्या चरणीं अर्पण केलं. ऋषीनं सांगितलं, "हे घेऊन मी काय करणार?" असं म्हणून त्यानं तें राज्य परत केलं. व म्हणाला, "हे रामराजा लव व कुश हीं तुझीच मुलं आहेत. तूं सीतेला घेऊन जाऊन परत सुखानं रहावं ही माझी मागणी आहे."

राम म्हणाला, "सीतेनं अग्निप्रवेश करून प्रजेला आपल्या विशुद्ध शीलाची जाणीव करून द्यावी."

सीतेनं तें म्हणण कबूल केलं.

अयोध्येचे प्रजाजन त्या प्रसंगीं हजर झाले. सीतेनं चितेंन उडी घेतांच अग्निदेवतेनं तिला सिंहासनावर बसवलं. इतक्यांत पृथ्वी दुभंगली. आणि सीतेच आसन लुप्त झालं.

रामाला फार मोठं दुःख झालं. पण प्रजेच्या हितासाठीं तें दुःखहि त्यांनी गिळलं. राज्याची व्यवस्था रामचंद्रानी फारच चांगली केली. भरताला सिंधूचं राज्य दिलं.

एके दिवशी एक ऋषी रामाकडे आले आणि म्हणाले, "तुमच्याशी मला कांहीं खाजगी बोलायचं आहे. आपण बोलतांना कुणीहि आंत येऊं नये आणि आला तर त्याचा तुम्ही आजन्म त्याग करावा तोंड देखिल पाहूं नये"

"ठीक आहे," राम म्हणाला,

लक्ष्मणाला पहारेदार करुन ते दोघे आंत गेले इतक्यांत दुर्वास लक्ष्मणाजवळ आले आणि म्हणाले,

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

" मला रामाला भेटायचं आहे "

" आपण थोडं थांबा. आंत राम कुणाशी तरी बोलत आहेत. "

हे ऐकतांच दुर्वासचा राग अनावर झाला व तो शाप देणार इतक्यांत लक्ष्मण म्हणाला, थांबा, थांबा ऋषिराज, मी आंत जातों व आपल्या आगमनाची वार्ता रामाला कळवितों. लक्ष्मण आंत गेला. रामानं दिलेल्या वचनाप्रमाणं लक्ष्मणाचं तोंड न पाहण्याचं ठरविलं. लक्ष्मणाला ही गोष्ट फार लागली. तो रथांतून शरयू नदीच्या कांठीं आला व नदींत उडी मारून त्यानं समाधी घेतली.

हे जेव्हां रामाला कळालं तेव्हां रामाला फार वाईट वाटलं. त्यांनीं राज्याची धुरा लव कुशावर टाकून ते विमानांत बसून स्वर्गाला निघून गेले.

कुशानं आयोध्येचं राज्य अगदी वडीलासारखं केलं. त्याला अतिथि नांवाचा मुलगा झाला. तो अत्यंत पराक्रमी व फार मोठा योद्धा होता. राक्षसांशी लढतां लढतां कुश युद्धांत मारला गेला. त्यामुळं अतिथि राजा झाला. त्यानं सर्व पृथ्वी पुन: जिंकून घेतली. पण जिकतांना कुणाशीहि युद्ध त्यानं केल नाहीं. प्रेम हेच त्याचं शस्त्र. यामुळं तर त्याची कीर्ति चारही दिशेला पसरली. रामराज्याहूनहि खरं. कल्याणकारी राज्य अतिथीनं केलं असा त्याचा नांव लौकिक

यानंतर याच कुळांत क्रमानें निनद, नल, नभ, पुण्डरीक, क्षेमधन्वा, देवानीक, अहिनग, परियात्र, शिल, उन्नाभ इत्यादि राजे झाले.

पण याच कुलांतील शेवटच्या राजाचा इतिहास अत्यंत उद्वेगकर आहे. शेवटचा राजा अग्निवर्ण. कांहींकाल राज्य केल्यावर याला विलासाची गोडी लागली. शेंकडों लग्न करूनहि त्याला आनंद वाटेना. देशोंदेशीच्या नर्तिकांनी त्याचा महाल गजबजला. खाद्यपेयासाठींच सर्व खजीना संपूं लागला. जुगारामुळं एकएक प्रदेश ताब्यांतून जाऊं लागला. दारूच्या धुंदींत दिवस काय अन् महिने काय? किती काळ गेला हें त्याला कळालें नाहीं. प्रजा नागवली गेली. सारी राजधानी उपऱ्या लोकांनी भरून निघाली. रामाची पुण्याई सरली. अयोद्ध्यापुरी नरकपुरी झाली.

अति विलासी जीवनामुळं अग्निवर्ण आजारी पडला. त्याचं अंग न् अंग सडूं लागलं, ही वार्ता लोकांना शेवटपर्यंत कळूं दिली नाहीं. इतकच नव्हे तर पट्टराणीलाहि हें कळविण्यांत आलं नाहीं. राजाला गुप्त रितीनं राजमहलांतील बगीच्यांत जाळण्यांत आलं.

इतका अनर्थ झाला तेव्हां प्रजेचे डोळे उघडले. प्रजेनं उघड बंड केलं. आणि गर्भवती असणाऱ्या पट्टराणीला महाराणी म्हणून राज्यावर बसविलं. क्रांति सफळ झाली पुनः अयोध्या स्वर्गपुरी झाली.

IRBK-0106247